खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## तृतीय वर्ष कला (TYBA)

## मराठी (एस - 3)

## सत्र : सहावे

# विषय : मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा स्थूल इतिहास (इ.स.१६०० ते १८१७)

## घटक २) पंडित आणि शाहिरांची वाङ्मयनिर्मिती

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

SANJAY MAR HRM

# घटक २) पंडित आणि शाहिरांची वाङ्मयनिर्मिती

## १)पंडित वाङ्मय वैशिष्टे , प्रेरणा , स्वरूप :
## (मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, मोरोपंत)

## २)शाहिरी वाङ्मय वैशिष्टे , प्रेरणा , स्वरूप :
## (अनंत फंदी, परशराम, राम जोशी, प्रभाकर, होनाजी बाळा)

---

### १ .पंडिती काव्य, प्रेरणा, स्वरूप व कार्य

प्रास्ताविक –

प्राचीन मराठी कवितेत संत काव्य, पंडिती काव्य आणि शाहिरी काव्य असे तीन प्रमुख प्रवाह दिसून येतात. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम इत्यादी संतांनी ओवी आणि अभंगाद्वारे केलेल्या रचनेस संतकाव्य असे म्हणतात. **मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, मोरोपंत इत्यादी पंडितांच्या संस्कृत गणवृत्तांतात लिहिलेल्या आख्यानपर रचनेस पंडिती काव्य असे म्हणतात.** तर शृंगार आणि वीर रसामध्ये लावणी व पोवाडयाच्या माध्यमातून लोकजीवनातील विविध विषय रंगविणाऱ्या शाहीर कवींच्या काव्यास शाहिरी काव्य असे म्हणतात.

पंडिती काव्याचे स्वरूप व वैशिष्टे –

१) पंडित कवींनी संस्कृत महाकाव्याचे आदर्श समोर ठेवले होते. आपले काव्य अधिक कलात्मकतेने सजविण्याची पंडितांची लेखनविषयक दृष्टी होती. त्यांनी **मराठीला संस्कृतचा डौल मिळवून दिला.**

२) कालिदास, श्रीहरी, माघ यासारखे महाकवी, भवभूती, जयदेवादी नाटककार यांच्या कलाकृती अभ्यासून त्यांचे अनुकरण आपल्या कवितेत करण्याचे काम पंडित कवींनी केले. **शब्दालंकार, अर्थालंकार, विविध वृत्तांतात्मक रचना, संस्कृत कवितेतील संकेत, सामाजिक रचना व कलात्मक निवेदन यांचा वापर पंडित कवींनी केला** आणि मराठी कवितेचे दालन विविध काव्यप्रकारांनी समृद्ध केले. त्यातून महाकाव्ये, खंडकाव्य, लघुकाव्य, कथाकाव्य, स्तोत्र, चंपुकाव्य असे विविध काव्यप्रकार मराठीत आले.

३) पंडिती कवितेत कथाविषय जुनेच असले तरी **रचनाविषयक जाणीव नव्याने आली** असल्याने त्यात रसिकतेने रंग भरले गेले.

४) संत साहित्यात शांत आणि त्यातून निर्माण होणारा भक्तीरसाचा आविष्कार दिसतो. तर पंडिती काव्यात **शृंगार, करूण, हास्य, वीर, भयानक, शांत, बीभत्स, रौद्र आणि अद्‌भूत या ९ रसांची** जाणीवपूर्वक आविष्कार करण्याची प्रेरणा दिसून येते. तसेच **शब्दनिष्ठ व अर्थनिष्ठ अलंकारांचा अतिरेक** झालेला दिसतो.

SANJAY MAR HRM

५) संत कवितेतल्या आत्माविष्कारामुळे संत कवितेला उत्कटता प्राप्त झाली. तर पांडित्य प्रदर्शनामुळे व वस्तुनिष्ठ भूमिकेमुळे ती **उत्कटता पंडिती कवितेला प्राप्त झाली नाही**. उलट काही ठिकाणी जी बोजड व क्लिष्ठ झाली. कुठे कुठे कलात्मकतेची जागा कारागिरीने घेतली. प्रसंगानुरूप भावनावेग साधण्याचा प्रयत्न पंडिती कवींनी केला असला तरी संत साहित्याप्रमाने **ह्रदय हेलावून सोडण्याचे सामर्थ्य पंडिती कवितेत नाही**. वरील उणिवा लक्षात घेऊनही १७ व्या शतकापासून १८व्या शतकापर्यंत मराठी कवितेचे दालन विविध काव्यप्रकारांनी समृद्ध करण्याचे कार्य पंडित कवींनी केले हे मान्य केले पाहिजे.

**थोडक्यात**

पंडिती काव्यात संस्कृतमधील **पुरान ग्रंथांच्या आधाराने आपल्या विद्वत्तेच्या प्रसिद्धीसाठी विषयनिष्ठ कथात्मक काव्यलेखनाची प्रेरणा दिसते**. पंडिती कवींनी काव्यरचनेचे विविध प्रकार हाताळताना त्यात महाकाव्य, खंडकाव्य या **संस्कृतमधील मूळ काव्यप्रकारांशी मिळतीजुळती आख्यानकविता, कथाकाव्ये रचली**. पंडितांनी कोणत्याही संप्रदायाला बांधील न राहता **आपले स्वत्व आणि कवित्व कलाविलासाठीच पणाला लावले**. अर्थात असे असले तरी विविध रसांचा अवलंब, **वृत्ते, अलंकारांची हौस, जड शब्दयोजना आणि संस्कृतच्या अतिरेकी अवलंबणामुळे पंडिती काव्य सर्वसामान्यांच्या मनाला साद घालू शकले नाही**. किंबहुना संस्कृतप्राचुर्य, यमकासाठी ओढातान व अपरिचित शब्दयोजना यामुळे पंडिती कविता काही ठिकाणी क्लिष्ठ बनली व सर्वसामान्यांपासून दूर राहिली.

अशा प्रकारे **पंडिती काव्याची परंपरा संस्कृत साहित्यशास्त्र व संस्कृत साहित्य यांच्या छायेत वावरली**. त्यामुळे संस्कृतच्या परंपरेचा पगडा पंडिती साहित्यावर बसला. विविध वृत्तांचा व अलंकाराचा वापर व कथात्मकतेतून साधणारी रसोत्कटता हे त्यांचे विशेष जाणवत राहिले. परंतु पांडित्य प्रदर्शनाचा हव्यास व विशिष्ठ वर्गासाठी झालेले लेखन या मर्यादांमुळे ते समाजापासून व इतर प्रवाहापासून दूर राहिले.

## पंडित कवी –

### १.मुक्तेश्वर (इ.स. १५७३ ते १६४५)

अध्यात्म आणि भक्ती या विषयांची परंपरा बाजूला सारून **महाभारताच्या निमित्ताने आपल्या कवितेतून लौकिक भावभावनांचे चित्रण रसिकपणे करणारा पहिला कवी म्हणजे मुक्तेश्वर होय**. नाथांचे संस्कार ( मुक्तेश्वर हे एकनाथांचे नातू होते) तीर्थाटनामुळे आलेले बहुश्रुतत्त्व आणि मूळची कलासक्त वृत्ती यांचा त्रिवेणी संगम मुक्तेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला दिसून येतो.

### मुक्तेश्वरांची कविता –

**श्लोकबद्ध रामायण** (श्लोक ६६१), महाभारताची **आदी, सभा, वन, विराट आणि सौप्तिक ही पाच पर्वे** (एकूण ओवीसंख्या १४०७९), **हरिचंद्राख्यान, शतमुखरावणवधाख्यान, मुर्खांची लक्षणे, भगवत्‌गीता,**



SANJAY MARHRM

**शुकरंभासंवाद, एकनाथचरित्र, काही दानभक्तीपर पदे व आरत्या** अशी मुक्तेश्वरांची रचना असून ती सुमारे १७००० भरते. त्यांनी आणखी एक 'उत्तरकांड रामायण' ही लिहिले आहे.

## मुक्तेश्वरी महाभारत –

महाभारताची रचना ही मुक्तेश्वरांच्या स्वतंत्र प्रतिभेचा आविष्कार आहे. महाभारताची आदी, सभा, वन, विराट आणि सौप्तिक ही पाच पर्वे त्यांनी सुमारे १४०७९ ओवीमध्ये लिहिली आहेत. उष:काल वर्णन व वनपर्वातील वर्षावर्णन मुक्तेश्वरांच्या निसर्गप्रेमाचे दर्शन घडवितात. वीररस व करूणरस यांचा अनेकदा उत्कर्ष साधला आहे. मुक्तेश्वरांच्या महाभारतातील **ययाति आख्यान, दुष्यंत शकुंतलाख्यान (आदिपर्व), नलदमयंती आख्यान, सावित्री (वनपर्व), जरासंधवध, द्रौपदीवस्त्रहरण (सभापर्व)** यासारखी कितीतरी आख्याने सुंदर प्रसंगनिर्मिती आणि जिवंत व्यक्तीचित्रण यामुळे सुरस आणि कलापूर्ण झाली आहेत.

महाभारत कथा निवेदनात मुक्तेश्वर स्वत:चा काळ व परिस्थिती विसरू शकत नाही. उदा. दुष्यंताला ते 'गोब्राह्मणप्रतिपालक' म्हणून संबोधतात व त्याने **फिरंगी, इंग्रज, मुसलमान जिंकल्याचे सांगतात.** तर द्रौपदीवस्त्रहरण प्रसंगी त्यांनी महाराष्ट्रातील अनेक **पेठांमधील वस्त्रांची यादी** दिली आहे. भीम – किचक यांच्या मल्लयुद्धात त्यांनी त्यांच्या **काळातील कुस्त्यांचे डावपेच** दिले आहे आणि उत्तरा – अभिमन्यु विवाहातील **भोजन प्रसंग वर्णनात** त्याने शेवया, दहीवडे इ. अनेक तत्कालीन पक्वानांची यादी दिली आहे. हे सर्व उल्लेख त्यांच्या मराठी मनाची साक्ष देतात.

भक्तीपूर्व काव्य लिहिण्याच्या काळात मुक्तेश्वरांनी आपल्या उत्तुंग प्रतिभेने एक स्वतंत्र विश्व निर्माण केले आहे. मार्मिक उपमा, समर्पक दृष्टांत, पल्लेदार रूपके यातून मुक्तेश्वरांच्या कल्पना विलास प्रकट झाला आहे. मुक्तेश्वरांच्या काव्याचे पंडिती वळण, अर्थहीन यमके, खोचक प्रश्नोत्तरे, मुग्ध शृंगार, नाजूक उपहास, मोहक वर्णने, तत्त्वज्ञान सूचक रूपके, रस निर्मिती अशी काही वैशिष्टे सांगता येतील.

## २. वामनपंडित (इ.स. १६०८ ते १६९५)

वामन पंडित हे रामदासस्वामी समकालीन असून पंडिती संप्रदायाचे प्रातिनिधीक कवी होत. विविधता आणि विपुलतेने त्यांचे काव्य नटलेले आहे. वामन पंडितांच्या काव्याचे वेदान्तविषयक, पौराणिक आख्यानपर आणि भाषांतरित असे तीन भाग अभ्यासक पाडतात. त्यांच्या एकूण **काव्यपंक्तींची संख्या जवळजवळ ४०,००० असून त्यातील निम्म्या काव्यपंक्ती वेदांत निरूपणाला वाहिलेल्या आहेत. त्यांनी निगमसार, यथार्थदीपिका, चित्सुधा तत्त्वमाला, श्रृतीसार, कर्मतत्त्व, राजयोग, गीतावर्णसुधा इ. ग्रंथ व छोटी पदे** लिहिली आहेत.

## निगमसार –

हा ग्रंथ नावाप्रमाणेच **वेदान्ताचे सार** थोडक्यात सांगणारा आहे. हा ग्रंथ अध्यात्मपर आहे. 'ग्रंथ हा निगमसार । शब्द थोडे अर्थ फार।' असे आपल्या ग्रंथाबद्दल ते सांगतात. या ग्रंथाची मांडणी पंडिती वळणाची

असून फारसा पाल्हाळ नाही. रेखीवपणा व नेटकेपणाचे हे या ग्रंथाचे सौंदर्य आहे. वामन पंडित शब्दचिकित्सक असल्यामुळे त्यांची विवेचन पद्धती तर्काला धरून आहे.

### समश्लोकी गीताटीका –

वामन पंडितांना श्रीकृष्णाचे, श्रीकृष्ण चरित्राचे फार आकर्षण आहे. प्रत्यक्ष त्या परमात्म्याचे शब्द म्हणले 'गीता'. श्रीकृष्णाने हे संस्कृतात सांगितलेले तत्त्वज्ञान 'भूलोक' भाषेत सांगावे, ही वामन पंडितांची तीव्र ईच्छा. गीतेवर व्याख्यान दिले तर ती निर्मळ स्वरूपात सांगितली असे होत नाही. म्हणून त्यांनी समश्लोकी गीताटीका रचली. या ग्रंथातील प्रत्येक अध्यायाला वामनांनी उपसंहार जोडला असून, ग्रंथाच्या शेवटी ग्रंथाची फलश्रृती सांगितली आहे.

### यथार्थदीपिका –

गीतेचे तत्त्वज्ञान आपणच यथार्थपणे सांगू शकतो या भावनेतून वामन पंडितांनी या ग्रंथाचे लेखन केले आहे. यात त्यांनी ज्ञानयुक्त सगुण भक्तीचे प्रतिपादन केले आहे. परमेश्वराच्या मनाचा खरा अर्थ आपल्या 'यथार्थदीपिकेत'च स्पष्ट होतो, असा त्यांचा दावा आहे. त्यांनी निर्गुण भक्ती नाकारली असून ज्ञानयुक्त सगुण भक्ती हीच सर्वश्रेष्ठ मानली आहे. यापूर्वी ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' व दासोपंतांनी 'गीतार्णव' लिहून गीतेवर टीका केली होती. 'ज्ञानेश्वरी' भावार्थ सांगते तर 'गीतार्णव' हा विनाकारण पाल्हाळ आहे. म्हणून आपण गीतेवर यथार्थ टीका करणार आहोत, अशी भूमिका वामन पंडितांनी घेतली. **यथार्थदीपिकेची ओवीसंख्या २२,२६६ असून त्यातून त्यांच्या पांडित्याची व भाषा प्रभुत्वाची ओळख पटते.** मात्र ज्ञानेश्वरीप्रमाणे काव्यात्मकता यात नाही. उपमा, दृष्टांतवादी अलंकार फारसे नाहीत. परखड निवेदन, तर्कशुद्ध विचार यथार्थदीपिकेत आहे. सगुण भक्तीचा उत्कट आविष्कार या ग्रंथात पाहावयास मिळतो.

### आख्यानक कविता –

अध्यात्मप्रवण ग्रंथापेक्षा आख्यानक कवितेमधूनच वामनांच्या रसिक व पांडित्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख पटते. भागवत व रामायण ही त्यांच्या आख्यानाची गंगोत्री आहे. वामनाची सारी श्रीकृष्णचरित्रपर आख्याने 'रस व नाद' यामुळे मोहक झाली आहेत. श्रीकृष्णकथेबरोबर रामजन्म, अहिल्योद्धार, सीतास्वयंवर, भरतभाव, लोपमुद्रा संवाद इ. आख्यानांच्याद्वारे वामनांनी रामकथाही लिहिली आहे. मात्र वामनांच्या शृंगारप्रिय लेखणीला फारसा वाव नसल्याने त्यांची ही आख्याने श्रीकृष्ण कथेइतकी आकर्षक होऊ शकली नाही. भागवती आख्याने ही वामनाची मराठी कवितेला खास देणगी आहे. या आख्यानांत नाटयपूर्णता, आकर्षकता, कल्पकता व रचनेचा सफाईदारपणा असून पंडितांचे, शब्दचित्र रेखाटनाचे कौशल्यही उल्लेखनीय आहे.

SANJAY MARHRM

### भाषांतरीत कविता –

वामन पंडितांनी शंकराचार्यांकृत अपरोक्षानुभूती, समरलोकी, भगवद्गीता, जगन्नाथाची गंगालहरी, भर्तृहरीचे नीतिशतक, शृगांरशतक, वैराग्यशतक यांची मराठीत भाषांतरे केली आहेत. त्यांच्या ठायी असलेल्या व्यासंग आणि उदंड भाषाप्रभुत्वामुळे हे शक्य झाले आहे.

### थोडक्यात –

रामदासांच्या उपदेशावरून महाराष्ट्र भाषेत लेखन करणाऱ्या वामनांची ग्रंथसंपदा अफाट आहे. यमक व अनुप्रासाचा हव्यास हे त्यांच्या लेखन शैलीचे वैशिष्टे आहे. काही वेळा हव्यासातून औचित्यहानी झाली आहे. अशा या वामनांनी मराठीतील खंडकाव्याचा पाया घतला. भाषाप्रभुत्व व रचना कौशल्य यातून विविध वृत्तात्मक श्लोकरचना करून 'सुश्लोक वामनांचा' हे बिरूद सिद्ध केले. रसानुकूल शब्दयोजना, अनुप्रास व यमक अलंकारांचा वापर, हुबेहुब प्रसंगचित्रण, भाषाप्रभुत्व हे त्यांच्या रचनेचे वैशिष्टे होय.

**'सुश्लोक वामनाचा । अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।**
**ओवी ज्ञानेश्वरांची । आर्या मयुरपंतांची ।'**

अशा रचनेतून वामन पंडितांच्या काव्याचा गौरव केला आहे.

## रघुनाथ पंडित –

पंडित कवींच्या संप्रदायात आणि मराठी आख्यानक कवितेत आपल्या अल्प पण काव्यगुणपूर्ण रचनेने श्रेष्ठ स्थान मिळविणारे कवी म्हणजे रघुनाथ पंडित. **'रामदासवर्णन', 'गजेंद्रमोक्ष', व 'दमयंती स्वयंवर'** अशी मोजकीच रचना त्यांनी केली.

### रामदासवर्णन –

'रामदासवर्णन' हे त्यांचे पहिलेच काव्य होय. यात वसंततिलका वृत्तातील एकूण अकरा श्लोक असून यात समर्थांच्या गिरीकंदरी फिरण्याचा, त्यांच्या कपाळावरील आवळाचा व समर्थ नेहमी लेखणी, कागद, दौत सोबत ठेवत याचा उल्लेख आहे. स्वतः रघुनाथ पंडित समर्थभक्त असून, समर्थांच्या आज्ञेवरून त्यांनी इ.स. १६८१ मध्ये कर्नाटकातील तंजावरहून श्रीरामलक्ष्मण यांच्या मूर्ती सज्जनगडावर पाठविल्या होत्या.

### गजेंद्रमोक्ष –

त्यांचे 'गजेंद्रमोक्ष' हे प्रकरण भागवतातील आख्यानावर आधारित असून त्यात विविध वृत्तांत रचलेले ५८ श्लोक व ३ पदे आहेत. सुसरीच्या तडाख्यातून सुटका करावी म्हणून गजेंद्राने केलेला श्रीहरीचा धावा व तो धावा ऐकून श्रीहरीने केलेली त्याची सुटका या भागवतातील कथेवर हे काव्य आधारित आहे.

SANJAY MAR HRM

## दमयंती स्वयंवर –

रघुनाथ पंडितांनी इ.स. १६८५ साली लिहिलेल्या 'दमयंती स्वयंवर' हे नितांत रमणीय काव्याने त्यांना फार मोठे यश मिळवून दिले. काव्यगुणांच्या दृष्टीने हे प्राचीन मराठीतील सर्वश्रेष्ठ काव्य मानले जाते. संस्कृतमधील पंचमहाकाव्ये समोर ठेवून त्यांनी ही काव्यरचना केली आहे. महाभारतातील कथानकांच्या आधारे **श्रीहर्षाने जे 'नैषधीयचरित्र' लिहिले. त्याचा आदर्श समोर ठेवून रघुनाथ पंडितांनी आपल्या 'दमयंती स्वयंवराची' रचना केली. मूळ नैषधीय काव्यात १७५० श्लोक आहेत. त्याचे रूपांतर रघुनाथ पंडितांनी केवळ २५४ श्लोकांत केलेले आहे. केवळ भाषांतर ही दृष्टी न ठेवता श्रीहर्षाच्या सुंदर कल्पना त्यांनी मराठीत आणल्या. नैषधकाव्याचे कथानक हे शृंगार व करूणरसपूर्ण वनवास या कथाभागात विभागले आहेत. पण रघुनाथ पंडितांनी फक्त नल–दमयंतींच्या स्वयंवरापर्यंतचाच कथाभाग आपल्या काव्यात घेतला आहे.** करूणरसपूर्ण उत्तरार्धाचे विवेचन त्यात नाही.

या स्वयंवर काव्यात व्यक्तीरेखाटन व भावनाविष्कार ठळक असल्यामुळे दुर्बोधता जाणवत नाही. कवीने नल, दमयंती, भिमक यांच्याबरोबर हंस या पक्षाचीही व्यक्तीरेखा सुंदर रेखाटली आहे. हा हंस कुटुंबवत्सल आहे. त्याला मानवी भावना असून त्यांचा तो सहज आविष्कार करतो. त्यामुळे

**'कठीण समय येता कोण कामास येतो'**

असे नलाशी वा दमयंतीशी झालेले हंसाचे संभाषण कृत्रिम वाटत नाही. काव्यातील एक जिवंत व्यक्तिरेखा म्हणून आपण त्याचा सहज स्वीकार करतो. या काव्याला अद्‌भूततेचे रूप देण्यात कवी यशस्वी झाला आहे. रघुनाथ पंडितांच्या काव्याची नायिका असलेली दमयंती ही अत्यंत सुंदर, मानी, अल्लड अशी यामध्ये रेखाटली आहे. **'औषध नलगे मजला'** या दमयंतीच्या उद्‌गारातील 'श्लेष' चपलखपणे त्याचा भाव व्यक्त करतो.

या काव्यातील प्रसंगनिर्मिती कवीच्या उत्तुंग कल्पनाशक्तीचे दर्शन घडविते. हंस–नल यांची पहिली भेट, हंस–दमयंती संवाद, नल–दमयंती भेट, हंसाचे वर्णन व स्वभाव रेखाटन इत्यादी प्रसंग नयनरम्य झाले आहेत. विरहाने दमयंती बेशुद्ध होते तेव्हा **'गडबड बहू झाली माय धावोनि आली'** या प्रसंग चित्रणात कवीचे व्यवहार चातुर्य दिसते. **'मूल उपवर ही जाहली'** या तिच्या आईच्या उद्‌गारात स्त्री स्वाभाविक सुलभता दिसून सेते. दमयंतीप्रमाणे नलाच्या विरहाचे वर्णनही कवीने केले आहे. दमयंती स्वयंवरामध्ये रघुनाथ पंडिताचे संक्षेप चातुर्य, अलंकार प्राचुर्य व अभिजात रसिकता यांचे दर्शन घडते. हे काव्य 'नलदमयंती आख्यान' या नावानेही परिचित आहे.

## मोरोपंत (इ.स. १७२९ ते १७९३) –

मोरोपंत यांचे पूर्ण नाव 'मोरोपंत रामचंद्र पराडकर'. मोरोपंत हे पंडित परंपरेतील सर्वश्रेष्ठ आणि काळाच्या दृष्टीने शेवटचे कवी होत. संत नामदेवांच्या आढळून येणारी परमेश्वरांच्या कृपेविषयी तळमळ, नाथांच्या ठिकाणी दिसणारे गृहस्थाश्रमातील कतर्व्यपूर्तीचे समाधान, वामन पंडितांचे पांडित्य, निरंजन माधवाचे रचनाचातुर्य,

दासोपंताची प्रचंड लेखनशक्ती, अनुवादातील विशेष असा प्रामाणिकपणा, भगवद्‌चरित्र गायनाची अमर्याद गोडी अशी अनेकविध वैशिष्टे मोरोपंतांच्या ठिकाणी एकत्रित झालेली आढळतात.

मोरोपंतांनी वयाच्या २४व्या वर्षांपर्यंत कोल्हापूरजवळ पन्हाळ्यास केशवशास्त्री व गणेशशास्त्री पाध्ये यांच्याकडे अध्ययन केले. अध्ययनानंतर इ.स. १७५२ मध्ये ते बारामतीस बाबूजी नाईक यांच्याकडे पुराणिक म्हणून आश्रयास आले. पुराण सांगितल्यावर उरलेल्या वेळात कविता करणे हा त्यांचा आवडता छंद होता. मोरोपंतांनी उदंड कविता लिहिली. १) **रामायणे (त्यांची संख्या १०८ आहे.) ओवीसंख्या** १६००. २) **हरिवंश ओवीसंख्या** ५४४४. ३) **महाभारत (ओवीसंख्या** १७७०), **कृष्णविजय, मंत्रभागवत इ. याशिवाय अनेक भागवती प्रकरणे, काशी प्रकरणे, संतप्रकरणे, कुशलव्याख्यान स्तोत्रे, सीतागीतासारखी स्त्रीगीते, श्लोककेकावली, संशयरत्नभाषा,** यासारखी आत्मनिष्ठ काव्ये त्यांच्या प्रचंड रचनेची साक्ष देतात.

मोरोपंतांनी रचनेची प्रेरणा संस्कृत काव्यातून घेतली. पंडित परंपरेतील मोरोपंत हे सर्वश्रेष्ठ कवी. त्यांच्या प्रकाशित (ओवीसंख्या ५७०७५) व अप्रकाशित (ओवीसंख्या ४७०७५) अशा एकूण काव्यसंग्रहातील ओवींची संख्या एक लाखाच्या वर जाते. शांत, धर्मनिष्ठ, कुटुंबवत्सल, व्यवहार चतूर व व्यासंगी अभ्यासक, प्रभावशाली पुराणिक, कलावादी कवी व खरेखुरे भगवद्‌भक्त असे मोरोपंतांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत.

## मोरोपंतांची काव्यदृष्टी –

वैयक्तिक समाधानासाठी भगवद्‌चरित्र गायन हा पंतांच्या काव्यलेखनाचा हेतू होता. ईश्वराची कीर्तन स्मरणरूपी भक्ती करावी, ही प्रेरणा त्यांच्या काव्य रचनेमागे आहे. त्याबरोबरच साहित्यगुणांनी युक्त अशी पंडिती कविता करावी, परमेश्वर प्रसादाबरोबर रसिक जनांचा संतोषही साधावा अशी त्यांच्या कवितेची भूमिका आहे. भक्ती हे साध्य आणि काव्य हे तिचे केवळ साधन झाल्यावरही साध्याच्या नादात साधनेकडे दुर्लक्ष करावे असे मात्र त्यांना वाटत नव्हते. हा इतर पडित कवी आणि मोरोपंत यांच्यात फरक आहे. या विशिष्ट काव्यदृष्टीमुळे ते देव व देवपूजा यात इतके गुंतले की भोवताली पाणिपतसारख्या मराठी सत्तेला हादरा देणाऱ्या संघर्षांचा त्यांच्या कवितेवर काही परिणाम झाला नाही.

## मोरोपंतांची काव्यरचना

### १ .कुशलवोपाख्यान –

कुशलवोपाख्यान हे १३ अध्यायात विभागलेले व ५०८ श्लोकांचे आख्यान हे एक लक्षणीय पंडिती काव्य आहे. त्यांचे हे पहिलेच काव्य असल्याने संस्कृतचा अतिरेक होऊन त्याला क्लिष्ठता आली आहे. त्यात सीतात्याग, सीताशोक यासारखे करूण प्रसंग येतात. काही वर्णनांना रघुवंशाचा आधार आहे.

### २. आर्याभारत –

मोरोपंतांच्या काव्याचा मुक्त आविष्कार म्हणजे आर्याभारत. महाभारताचा आस्वाद आपल्या रसिक श्रोत्यांना द्यावा ही त्यामागची भूमिका होती. महाभारतासारख्या व्यापक काव्यग्रंथाला आर्यांच्या १७००० चरणात

आकारबद्ध करण्यास मोरोपंतांचे संक्षेप चातुर्य दिसते. संक्षेप विस्ताराचे कौशल्य, काव्य सजविण्यास लागणारी कवित्वशक्ती आणि संयम या गुणांमुळे मुक्तेश्वर आणि श्रीधर यांच्या महाभारतापेक्षा मोरोपंतांचे आर्याभारत अधिक उठून दिसते.

रसपूर्ण प्रसंगनिमिर्ती हे मोरोपंत शैलीचे वैशिष्टे अनेक प्रसंगातून जाणवते. उदा. शकुंतला, ययाती यांच्या आख्यानाच्या निमित्ताने शृंगार येतो. भीम – दु:शासन युद्धाच्या प्रसंगात वीररस आढळतो. अभिमन्यूच्या मृत्यूनंतर अर्जुन, सुभद्रा यांच्या शोकातून उत्पन्न झालेले कारूण्य दिसते. तसेच धृतराष्ट्र, द्रोण, कर्ण, अर्जुन, भीम, कुंती, द्रोपदी, सुभद्रा या व्यक्तिरेखांना मोरोपंतांनी आपल्या स्वत:च्या शैलीत वेगळे स्वरूप प्राप्त करून दिले आहे. मोरोपंतांनी यातून मनोरंजनाबरोबर सदाचरणाचा बोध केला आहे. ते समाजातले उच्च दर्जाचे नीतीशिक्षक होते. आजही कित्येक कीर्तनकारांना त्यांच्या या महाभारतातील प्रसंगांचा कीर्तनात उपयोग होतो.

### ३.संकीर्ण रामायणे –

मोरोपंत हे रामभक्त असल्याने त्यांनी आपल्या उपास्य देवतांची पूजा पुन:पुन्हा बांधली आहे. त्यांची ही १०८ रामायणे म्हणजे एक प्रकारची व्रतेच होती. मोरोपंतांनी आपले पांडित्य, भाषाप्रभुत्व, छंदशास्त्र, साहित्यशास्त्र, व्याकरणशास्त्र इ. शास्त्रांचे दीर्घ व्यासंगाने प्राप्त केलेले ज्ञान, शुद्ध व प्रेमळ अंत:करणाने रामाला, आपल्या उपास्य देवतेला अर्पण करण्यासाठी ही १०८ रामायणे रचली. अद्भूत रामायण, दंडक रामायण, दास रामायण, परंतु रामायण, पीयुष रामायण, पुण्य रामायण, मंत्र रामायण, श्रीरामायण, सीतारामायण इ. अशी त्या रामायणांची नावे आहेत.

### ४.भागवती प्रकरणे –

ही भक्तीप्रवण अशी सुंदर आख्याने आहेत. त्यापैकी ध्रुवचरित्र, वामनचरित्र, अंबरीष्टआख्यानही विशेष उल्लेखनीय आहेत. महाकाव्य अशा भागवताची ( पदये १३,५२२) पंतांनी ३,५०५ आर्यात रचना करून ते अगदी नेटक्या स्वरूपात मराठीत रसिकांसमोर मांडल्या. यात आर्या ३३३ नाममंत्रात गोविल्यामुळे त्याला 'मंत्रभागवत' असे नाव ठेवले जाते.

### ५.कृष्णविजय –

भागवताच्या दशमस्कंधावर असलेले हे पंतांचे विस्तृत भाष्य होय. एकूण ९० अध्याय असून पदसंख्या ३,६७० इतकी आहे. मुळापेक्षा सरसकट विस्तार असलेले मोरोपंतांचे हे एकमेव काव्य म्हणता येईल. यात सुदामचरित्र, अर्जुन–सुभद्रा विवाह इ. प्रकरणे उल्लेखनीय आहेत.

### ६.मोरोपंतांची स्फुट रचना –

#### अ) श्लोककेकावली –

उतारवयात लिहिलेले अन शेवटचे म्हणून उल्लेख असलेले मोरोपंतांचे हे काव्य ओळखले जाते. प्रसंगानुरूप भगवंतांच्या लीलांचा, कथांचा निर्देश करून, कौटुंबिक भावनांचे दृष्टांत देऊन, व्यावहारिक



SANJAY MARHRM

अनुभवातून निघालेले अनुभव योजून मोरोपंतांनी श्लोककेकावलीची खुमारी वाढविली आहे. भगवंतांनी आपला उद्धार करावा, कृपाप्रसादाचा वर्षाव करावा यासाठी योजिलेल्या युक्तिवादातही मोरोपंतांचे कौशल्य दिसते.

ब) आर्याकेकावली –

श्लोककेकावलीचे लिखाण झाल्यावर आर्यावृत्तावर प्रभुत्व प्राप्त झाल्यानंतर त्यांनी आर्याकेकावलीची रचना केली. श्लोककेकावलीच्या तुलनेत यात चमत्कृती कमी आहे. निवेदनात ओघवतेपणा असून यामधील उत्कटता मनाला स्पर्श करून जाते.

क) संशयरत्नावली –

संशयरत्नावलीमध्ये ईश्वर दर्शनाची उत्सुकता, दीनता, याचना, असे भाव आले आहे. मोरोपंतांचे स्वानुभवाचे बोल असल्याने ही स्तोत्रे अत्यंत प्रांजळ व ह्रदयद्रावक झाली आहेत.

क) स्त्रीगीते –

नेहमीच्या रचना कौशल्यापेक्षा साधी, प्रासादिक अशी उठून दिसणारी रचना म्हणजे स्त्रीगीते होय. उदा. सीतागीत, रूक्मिणीगीत, सावित्रीगीत इ. स्त्री सुलभ भावनांचा सहज आविष्कार या गीतात दिसतो.

**समारोप –**

कीर्तनकार, प्रवचनकार असलेल्या मोरोपंतांनी मराठी भाषेला शुद्ध लेणे बहाल केले. संस्कृतावरील प्रभुत्व हे त्याचे कारण असावे. तसेच मराठीत आर्यावृत्त त्यांनी रूजविले. मोरोपंत हे पंडिती परंपरेतील अखेरचे कवी. मुक्तेश्वरांपासून मराठी कवितेत जे साहित्यगुण यावयास लागले त्याचा प्रकर्ष मोरोपंतांच्या काव्यात झाला. मराठी काव्यात अभिजात काव्याचे जेथून निर्माण झाले त्याचा कळस मोरोपंत होय.

## २) शाहिरांची काव्यनिर्मिती –

**प्रास्ताविक –**

संतांच्या आणि पंडितांपेक्षा वेगळी व स्वतंत्र वळणाची कविता १८ व्या शतकात लिहिली जाऊ लागली. तिचा उल्लेख **शाहिरी काव्य असा** केला जातो. संत कवींनी **लोकजीवनाला व लोकमानसाला ईश्वरभक्ती शिकविली.** प्रसंगी **संत समाजाभिमुख झाले पण मोक्ष प्राप्ती हे त्यांचे ध्येय होते.** पंडित कवींनी पंचमहाकाव्यातून विविध विषय घेतले व त्यांना लौकिकाचा रंग देण्याचा प्रयत्न केला. शब्दालंकार व वृत्तात्मक रचना यांचा अतिरेक झाल्याने त्यांची कविता शब्दजालात बुडून गेली. शाहिरांचे मात्र तसे नाही. **शाहीर लोक जीवनाशी समरस झाले. लोकांच्या भावना त्यांच्याच शब्दात मांडणारे शाहीर हे लोककवी आहेत. भोवतालच्या वातावरणातील रगेलपणा आणि रंगेलपणातून शाहिरांची कविता निर्माण झाली.**



SANJAY MAR HRM

राम जोशी, अनंत फंदी, सगनभाऊ, होणाजी बाळा, परशराम इ. **शाहिरांच्या लेखनीतून आणि वाणीतून निघालेले हे काव्य डफ तुणतुण्याची साथ घेऊन पराक्रम करणारे वीर पुरूष व आपल्या रूप सौंदर्याने मोह घालणाऱ्या रूप यौवना यांचे प्रेमोत्कट भाव, भोवतालच्या वातावरणातील रगेलपणा आणि रंगेलपणा, त्यातून प्रत्यायाला येणारे प्रसंग या साऱ्यातून शाहिरांची कविता जन्माला आली.** मराठयांचे मनगट, मन, भावभावना, आचारविचार, पोषाख, मोठेपणा या साऱ्याचे प्रतिबिंब शाहिरांच्या काव्यात पडलेले दिसते.

## शाहिरी काव्य –

शाहिरी काव्याचे दोन प्रकार पडतात. **एक पोवाडा व दूसरा लावणी.** ज्या शाहिरांनी पोवाडे लिहिले त्यांनीच लावण्याही लिहिल्या. त्यामुळे या दोन्ही काव्य प्रकारांच्या प्रेरणा व निर्मितीत साम्य आढळते. दोन्ही काव्यप्रकार प्रामुख्याने **लौकिक जीवनातील** विषय हाताळतात. किंबहुना लौकिक जीवनातील विषय हे शाहिरी काव्याचे वैशिष्टे आहे. पोवाडा व लावणी यात भेद आहे. पोवाडा हा **वीररसात्मक** असतो. तर लावणीचा भर **शृंगारावर** असतो. पण इतर रसांचा आविष्कार करणाऱ्या लावण्याही आहेत. दोन्ही काव्यप्रकार स्फुट रचनेचे असले तरी **पोवाडयाची रचना दीर्घ कथनपर व निवेदनपर असते. लावणी त्या मानाने छोटी असून तिचे स्वरूप आत्मनिष्ठ किंवा नाटयगीतासारखे असते.** तिची रचनाही बंदिस्त स्वरूपाची असते. पोवाडा व लावणीची रचना करणाऱ्याला शाहीर म्हणतात.

## शाहिरी काव्याचा उदय –

शाहिरी काव्यातील पोवाडे हे शिवकालापासून आणि लावण्या ह्या केवळ उत्तर पेशवाईतल्या उपलब्ध असल्यामुळे पोवाडा हा काव्यप्रकार शिवकालात आणि लावणी हा काव्यप्रकार पेशवाईत जन्माला आला असे म्हटले जाते. परंतु प्रकाशात आहे त्याहून आधीचे कितीतरी शाहिरी काव्य काळाच्या उदरात गडप झाले असावे. नुकतीच 'शाहीर मन्मथशिवलिंग' यांची इ.स. १६०० पूर्वीची 'कऱ्हाडच्या भवानीवरील लावणी' उपलब्ध झालेली आहे. आज तरी उपलब्ध लावण्यात सर्वात जुनी लावणी हीच मानावी लागते. तसे पाहिले तर मुळात मौखिक परंपरा असलेला हा वाङमयप्रवाह लोकवाङमया इतकाच जुना आहे. आज ज्याला आपण शाहिरी वाङमय म्हणतो त्याचा प्रवाह अधिक विस्तृत आणि विविधांगी झाला, तो शिवकाल व नंतर उत्तर पेशवाईच्या काळात. या काळातील शाहिरी वाङमय संगीत, नृत्य, नाटय, अभिनय इ. अंगांनी विकास पावले. शाहिरी वाङमय मराठयांच्या इतिहासाशी निगडित आहे.

## पोवाडा काव्यप्रकाराचा विषय व स्वरूप –

पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमांचे, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे, सामर्थ्याचे, गुण कौशल्याचे काव्यात्मक वर्णन किंवा स्तुती होय. **प्र+वद म्हणजे ठासून स्तुती करणे. म.ना. सहस्त्रबुद्धे यांनी पोवाडयाला 'कीर्तीकाव्य' म्हटले आहे. अभिमान आणि आसक्ती यांच्या मोहातून पलीकडे जाऊ शकणाऱ्या विराची कीर्ती गाणे म्हणजे पोवाडा होय.** कुलधर्माच्या वेळी गोंधळ घालण्याचा प्रघात महाराष्ट्रात फार पूर्वीपासून आहे. या गोंधळातून

महाराष्ट्रात 'पोवाडा' हा प्रकार विकसित झाला असावा. पोवाडयात असलेली धावती, ओघवती रचना, आवेशपूर्ण भाषा यामुळे श्रोत्यांच्या मनात वीररसाची निर्मिती होते. 'पोवाडा' हे एक प्रकारचे नाटक आहे. नाटकातील सूत्रधाराप्रमाणे पोवाडयाचे संचलन करण्याचे काम शाहीर करतो.

पोवाडा हा रचनाप्रकार **रचनेच्या दृष्टीने दीर्घ असतो आणि त्याची मांडणी चौका–चौकानी केलेली असते. कवितेच्या कडव्यासारखे हे चौक असतात. पोवाडयाची रचना गद्य पद्यात्मक असते. गद्यभाग कथानकाचे सूत्र जोडण्यासाठी, कथाभागाचे स्पष्टीकरण करण्यासाठी असतो तर पद्य भाग ताल ठेक्यात पोवाडा सादर करण्यासाठी असतो. पोवाडयाची रचना दीर्घ कथनपर व निवेदनपर असते. पोवाडा हे दृश्य–श्राव्य असते.** कथानकाचा धागा शाबूत ठेवून कथेचे तात्पर्य तिऱ्हाईतपणे सांगण्याचे काम शाहीर करतो.

पोवाडयात वीरमरणाच्या सोहळयाचे वर्णन असते. त्यात जयगान, समरप्रसंगाचेही वर्णन असते. पोवाडे व्यक्तीस्तुतीपर, प्रसंगवर्णनपर असतात. पराक्रम, शौर्य, गौरव, विभूतीची पूजा या प्रेरणेतून पोवाडे निर्माण होताना दिसतात. स्वकालीन पराक्रमी पुरूषांचा पराक्रम वा समकालीन युद्धप्रसंगाचे पोवाडयामध्ये वर्णन केलेले आढळते. लोकजागृती हे ही पोवाडयाचे उद्दिष्ट असते. पोवाडयात साधारणपणे वीररस असतो. पण १५व्या शतकातील पोवाडयात देवस्तुती, राजस्तुती, थोर व पराक्रमी पुरूषाचे यशोगान, युद्धवर्णन इ. विषय आलेले दिसतात. १९व्या शतकात शिक्षण, सामाजिक धार्मिक सुधारणा आणि राजकीय प्रचारासाठी पोवाडे निर्माण झालेले दिसतात.

शाहिरांनी केलेल्या पोवाडयाची रचना स्वयंस्फूर्त मात्र नाही. त्यांचे लेखन आज्ञेवरून किंवा कुणाच्या तरी सांगण्यावरून झाले आहे. या कालखंडातील ३०० पोवाडे उपलब्ध असून त्यापैकी शिवकालीन चार, शाहूकालीन तीन, पेशवेकालीन दीडशे असून उरलेले अव्वल इंग्रजी काळातील आहेत.

## लावणी काव्यप्रकाराचा विषय व स्वरूप –

पोवाडा हा रांगडा, काहीसा ओबडधोबड तर लावणी नाजूक आणि अटकर बांध्याची असते. ती पोवाडयाच्या मानाने आकाराने लहान असून **तिच्यात निवेदनापेक्षा भावनाविष्काराला** प्राधान्य असते. पोवाडयाप्रमाणे **लावणी नृत्य, नाटय, अभिनय, संगीत आदी अंगांनी सादर होते. शृंगार हा लावणीचा रसराज असतो. सजण व सजणी यांची मनाला धुंद करणारी चित्रे लावणीत आढळतात. शृंगार, कौटुंबिक जीवन, भक्ती, अध्यात्म, सामाजिक वैराग्य, उपदेश इ. विषयांवर लावणी लिहिली जाते.** विषयदृष्टया लावणी पोवाडयापेक्षा अधिक व्यापक ठरते. लावणीमध्ये विवाह, युद्धाला जाणाऱ्या पतीला निरोप, त्याचा विरह, विरहोत्तर पुनर्मिलन, सात्त्विक प्रेम, व्याभिचारी प्रणय, निपुत्रिक स्त्रीचे दु:ख, डोहाळे, पुत्रजन्म, भोजनावळी, दुष्काळ, दंगे, रंगपंचमीचे दरबार इ. सर्वच विषय आहेत. अशा या लावणीचा जन्म पूर्वपेशवाईत झाला आणि पुढे पानिपतापासून स्वराज्य नाशाच्या कालखंडापर्यंत तर ती बहरत गेली. लावणीच्या जन्माचा आणि विकासाचा कालखंड म्हणजे मराठी साम्राज्याच्या ऐश्वर्याचा आणि अधिकाराच्या उपभोगाचा कालखंड सांगितला जातो.

### लावणीच्या व्युत्पत्तीबद्दलची मते –

लावणीच्या व्युत्पत्तीविषयी अनेक मते आहेत. **शेतात लावणी करताना म्हटले जाणारे गीत म्हणजे लावणी**. अशी एक व्युत्पत्ती आहे. परंतु लावणी हे लोकगीत असले तरी कृषिगीत नाही. त्यामुळे या व्युत्पत्तीला मान्यता देता येत नाही.

**लवण म्हणजे सुंदर. त्यावरून 'लावण्य' हा शब्द बनला आहे. लावण्याचे, स्त्री–सौंदर्याचे वर्णन करणारे काव्य म्हणजे 'लावणी'** अशी लावणीची व्याख्या केली जाते. परंतु सौंदर्य या अर्थाने लावणी हा शब्द मराठीत कुठे वापरलेला दिसत नाही.

**'जी ह्रदयाला चटका लावते ती लावणी' अशी लावणीची काव्यात्मक पण संदिग्ध व्याख्या अ.ब. कोल्हटकरांनी केली आहे**. त्यापेक्षा 'सर्वसामान्य जनांच्या मनोरंजनासाठी त्यांना रूचतील अशा लौकिक, पौराणिक व आध्यात्मिक विषयांवर रचलेली, ढोलकीच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटलेली खटकेबाज व सफाईदार रचना म्हणजे लावणी' ही म.वा. धोंड यांनी केलेली लावणीची व्याख्या अधिक समर्पक वाटते.

अशी ही लावणी संतकवींच्या आधीपासून चालत आलेल्या लोकगीतांतून उत्क्रांत झाल्याचे आढळते. संतकवितेतील गौळणी आणि विरहिणींमधील भावदर्शनाचे स्वरूप लावणीपेक्षा फारसे वेगळे नाही. पंडित कवींची राधा–कृष्ण प्रेम, कृष्ण–गोपी विलासा सारख्या विषयावरील आख्याने लावणीशी मिळतीजुळती आहेत. अशा प्रकारची लावणीची कुलपरंपरा आहे. लावणीला पुढे रागदारीची जोड मिळाली आणि तमाशाच्या फडातून ती कलावंतीनीच्या बैठकीत शिरली. लावणीचे पुढे शृंगारिक गाणे झाले.

### शाहिरी वाङमयाच्या प्रेरणा –

**पोवाडे राजकीय जीवनातून निर्माण झाले तर लावणी सामाजिक जीवनातून निर्माण** झाली. शाहिरी काव्य लोकरंजनासाठी निर्माण झाले. शाहिरी काव्य जनसमुहासमोर म्हटले जात असल्यामुळे त्या म्हणण्याच्या ढंगाला, तालबद्धतेला बरेच महत्त्व प्राप्त झाले. **या शाहिरांची प्रेरणा गाणाऱ्यांचे व ऐकणाऱ्यांचे मनोरंजन करणे हे होते. ते ज्या लोकसमूहात घडले होते त्या लोकसमूहातील भावभावनांचे चित्र त्यांनी आपल्या काव्यातून उभे केले**.

**शाहिरी वाङमयाचा श्रोता व प्रेक्षक सर्वसामान्य शेतकरी, कामकरी होता. त्यांच्या वाङमयीन जाणिवा लोकगीते, लोककलांनी घडलेल्या होत्या**. ते अशिक्षित असले तरी अवतीभोवतीच्या परिसरात प्रत्यक्ष वावरताना आलेले ज्ञान त्यांच्या गाठीशी होते. कर्ण व अर्जुण यांच्या युद्धाच्या अद्‌भूत पराक्रमापेक्षा आजूबाजूंच्या मराठी सरदारांनी गाजविलेले पराक्रमांचे वर्णन ऐकण्यात त्यांना रस होता. अशा या बहुजन समाजाची श्रोता म्हणून असलेली अपेक्षा शाहिरांच्या फडात तृप्त होणे शक्य होते.

या शिवाय **मुलुखगिरीत गुंतलेल्या, संसारात शिणलेल्या मनाला परत ताजेतवाने करून जीवनात नवा रंग भरण्याकरिता शाहिरांनी लावण्यांची रचना केली. पतिविरहाने झुरणाऱ्या नायिकेपासून, सवतमत्सर, निपुत्रिका, दोन बायका असलेल्या दादल्याची फजिती अशा अनेक विषयावर लावण्या रचल्या गेल्या**. पौराणिक लावण्या,



SANJAY MAR HRM

उपदेशपर लावण्या, देवदेवतांच्या लावण्या, तीर्थक्षेत्रांची वर्णने करणाऱ्या लावण्याही या काळात रचलेल्या दिसतात.

**शाहिरांनी थकलेल्या, भागलेल्या मनाला उल्हासित करण्यासाठी रचना केली. सहाजिकच लौकिक विषय निवडले तरीपण पौराणिक व आध्यात्मिक विषयही त्यात आले**. संत किंवा पंडित यांच्यापेक्षा शाहिरांच्या रचनेचा हेतू भिन्न आहे. पुराणांचा उपयोग त्यांनी लोकरंजनासाठी करून घेतला. काही शाहिरांनी 'फटके' लिहिले. त्यातून नैतिक शिक्षण दिले, उपदेश केला. अशा या शाहिरी वाङ्मयात मराठी पोषाख, चालीरीती, भाषा, संकेत, स्वभाव इ. सारी वैशिष्टे आढळतात.

## शाहिरांच्या काव्यनिर्मितीचा आढावा –

## १.अनंत फंदी (इ.स. १७४४ ते १८१९) –

अनंत फंदी हा मूळचा संगमनेरचा. आपल्या कवित्वाच्या बळावर हा पुडे कीर्तिवान शाहीर बनला आणि पेशव्यांच्या दरबारी कवी झाला. आज फंदीचे सात पोवाडे व काही लावण्या उपलब्ध आहेत. पोवाडे आणि लावण्यांशिवाय अनंत फंदी आजही स्मरणात राहतो तो त्याच्या कटाव आणि फटक्यांमुळे. फंदीचे फटके रसिकांना आजही आवडतात.

**'माधवग्रंथ किंवा माधवनिधनकाव्य'** हा एक ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. ३५९ ओव्यांचे हे ओवीबद्ध काव्य दुसऱ्या बाजीरावाने फंदीकडून लिहून घेतले. ६ अध्यायांच्या या काव्यात पहिले ५ अध्यायात सवाई माधवरावाच्या मृत्यूपासून दुसरा बाजीराव पेशवेपदावर येईपर्यंतच्या काळात घडलेल्या राजकारणावर असून यात बाजीरावाची बाजू मांडली आहे. ६व्या अध्यायात मात्र बाजीरावाच्या कारकिर्दीतील बेबंदशाही, दुष्काळ यांचे वर्णन आहे.

फंदीचे आज **सात पोवाडे** उपलब्ध असून त्यापैकी **खडर्याच्या लढाईवरील पोवाडा** उल्लेखनीय आहे. नाना फडणवीसाची करामत आणि युद्धात भाग घेतलेल्या सरदारांची यादी या तपशीलामुळे 'युद्धवर्णनात' फारसा वाव राहिला नाही. नाना फडणवीस, फत्तेसिंगराव गायकवाड व यशवंतराव होळकरांच्या पुणे प्रांतावरील कारभारावरही त्याने पोवाडे लिहिले आहेत. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीतील बेबंदशाही, अंदाधुंदी या विषयावर त्याने बरीच कवने लिहिली आहेत. उदा.

'उलटा जमाना आला रे । सेवक स्वामीचे मानीना' इ.

अनंत फंदीची 'चंद्रावळ लावणी' बरीच लोकप्रिय आहे. त्याच्या काळातील सौंदर्यविषयक दृष्टी काय होती याची कल्पना या लावणीतून येते. कृष्णाने रूक्मिणीचे रूप घेतल्यावर जे अलंकार घातले होते त्याचे तपशीलवार वर्णन करून त्यात बेलबाळया, पानबाळया, मासबाळया, मोतीबाळया अशा सुमारे बसवीस बाळयांचे उल्लेख आहेत. त्यातून तत्कालीन समृद्धी प्रकट होते.

**अनंत फंदीचे फटके म्हणजे उपदेशपर सुंदर कवने**. संसारिकांना आवश्यक असा मौलिक व्यावहारिक उपदेश फंदीने तडफदार आणि निर्भीड भाषेत केला आहे.

**'बिकट वाट वहिवाट नसावी । धोपट मार्गा सोडू नको ।**
संसारामदी ऐस आपला उगाच भटकत फिरू नको ।'

असे त्याचे तात्त्विक खडे बोल चटकन मनात ठसतात.

**'स्नेहासाठी पदरमोड कर परंतु जामिन होऊ नको ।**
बरी खुशामत शहाण्याची ती मुर्खाची ती मैत्री नको ।
कष्टाची ती भाजी—भाकरी तुपसाखरेची चोरी नको ।'

अशी सुंदर सुभाषितेही या फटक्यातून आढळतात. **व्यवहारज्ञान शिकवून 'संसारी माणसाला वर्तनक्रमाचा आदर्श घालून देण्याचे कार्य फंदीच्या फटक्यांनी केले.** सडेतोड उपदेश आणि प्रासादात्मकता यामुळे हे फटके खाताना श्रोत्यांना आजही आनंद वाटतो.

## २.परशराम (इ.स. १७५४ ते १८४४) —

राजकीय परिस्थितीचे स्पष्ट आणि निर्भीड चित्र रंगविणारा हा शाहीर मूळचा सिन्नर तालुक्यातला. व्यवसायाने शिंपी. देवपूरकर बाबा हे त्यांचे गुरू. त्यांच्या अनुग्रहाने व आदेशाने तो पोवाडा व लावणी रचनेकडे वळला. वीणा हाती घेऊन तो स्वत:च्या लावण्या गोड सुरात म्हणायचा. पुरूषाने स्त्रीचे सोंग घेण्याची प्रथा पहिल्यांदा परशरामाच्या लावण्यात पडली. परशरामाच्या 'पश्चिम वाहिनी गोदा, प्रतिमूळ गंगा' या लावणीतील गंगेची व पर्यायाने राघोबा व बाजीराव यांची स्तुती आवडून स्वत: बाजीरावाने त्याला जहागिरी देऊ केली पण,

**'पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा । महाल मोकासे जहरी करितील अपुला बंदा ।'**

असे रोख उत्तर देऊन त्याने ती नाकारली. बाजीरावाच्या अनीतीकर्मापासून बाजूला असलेला खेडयापाडयातील, शेतमाळावरील, झोपडया खोपटामधील मोकळा, स्वतंत्र, साधाभोळा, दिलदार, बाणेदार, हौशी मनाचा खरा मराठा त्याच्या लावणीत पाहावयास मिळतो. परशरामाच्या लावणीत विषयवैविध्य भरपूर आहे. **'उठ झाला प्रात:काळ' ही त्याची लावणी म्हणजे होनाजी बाळाच्या 'घन:श्याम सुंदरा'ची दुसरी आवृत्तीच आहे.** 'सती सुलोचना' हे पौराणिक विषयावरील एक सुंदर कथाकाव्ये त्याने लिहिले. आजवर मनात भरणाऱ्या सुंदर स्त्रियांची वर्णने अनेकांनी केली पण

'नयन सुरेख दोन्ही लाल अंगावर शाल दुपेटा जरी ।
उमदा कोणी उमराव दिसे सरदार सौभाग्य घरी ।'

हे परशरामाने कलेले मर्दानी स्त्री सौंदर्याचे वर्णन वेगळे आणि लक्षात राहणारे आहे. तसेच जीवनातील विसंगती त्याने लावण्यातून मांडली आहे. उदा. पतिव्रतेचे अनुकरण करणारी बाष्कळ स्त्री, सवतींचे भांडण, लडाईतून पळून आलेला पण फुशारकी मारणारा शेंदाड शिपाई, नवऱ्याला वेगळे होण्याचा आग्रह धरणारी दुधड नार अशी मसालेवाईक विनोदी चित्रे परशरामांच्या लावणीत आढळतात.

परशरामाने देशस्थितीपर आणि समाजस्थितीपर असे पोवाडे लिहिले आहेत. सूक्ष्म अवलोकन आणि नि:स्पृह निवेदन यामुळे या पोवाडयातून इंग्रजी आमदानीतील मराठी समाजाचे चित्र योग्य उमटले आहे. लोकांची

अगतिकता, सामाजिक जीवनातील विसंगती त्याने अचूक टिपली आहे. इंग्रजी आमदानीत धर्म बुडाला, शूर सरदार दीनवाणे आणि राजे तेजहीन व अभिमानशून्य झाले असेही त्याने लिहिले.

## ३.राम जोशी (इ.स. १७५८ ते १८१३) –

संस्कृतचा गाढा व्यासंग असलेला हा शाहीर मूळचा सोलापूरचा. मोरोपंतांच्या उपदेशानुसार राम जोशीने काही काळ कीर्तन केले. संस्कृच्या अध्ययनामुळे शिष्ट समाजाचे प्रभावी संस्कार त्यांच्या लेखनावर झालेले दिसतात. 'सुंदरा मनामध्ये भरली' ही त्यांची गाजलेली आणि रसिकप्रिय लावणी म्हणजे स्त्री सौंदर्याच्या मोहक आणि उन्मादक वर्णनाचा सुदर नमुना आहे.

**'सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली, हवेलीत शिरली मोत्यांचा भांग'**

किंवा

'अंगी तारूण्याचा बहर ज्वानिचा कहर मारिते लहर मदन तलवार'

अशा प्रासात्मकतेने या लावणीच्या सौंदर्यात मोठी भर घातली आहे. **'कुण्या ग सुभगाची मंजिरी'** ही लावणीही अशीच आहे. शृंगाराला भरपूर अवसर असणाऱ्या कृष्णलीलावर्णनपर लावण्यातही राम जोशींनी सद्‌भिरूचीची बंधने सोडलेली नाहीत. राम जोशींनी पौराणिक आणि देवदेवतांच्या वर्णनपर लावण्याही लिहिल्या आहेत. उदा. पंढरपूरवर्णन, तुळजापूरवर्णन इ. तसेच त्यांच्या उपदेशपर लावण्याही मनाची पकड घेतात. खटकेबाजपणा, प्रासात्मकता आणि भाषेचे लालित्य यामुळे लावण्या लोकप्रिय झाल्या आहेत.

राम जोशींनी पोवाडे थोडेच लिहिले आहेत. 'ब्राह्मणी राज्य जोरदार' हा त्यांचा पुणे वर्णनाचा पोवाडा प्रसिद्ध आहे. 'लंकाच पुण्यामध्ये लेश न दारिद्रयाचे, साक्षात विष्णु अवतार पेशवे कुळ' असे पुण्याचे आणि पेशवाईचे वैभव ते वर्णन करतात. नंतर पडलेल्या दुष्काळामुळे या साऱ्या वैभवाची हानी कशी केली याचे चित्र त्यांनी दुष्काळावरील पोवाडयात रंगविले आहे. या शाहिराची बाजीरावाने बरीच कदर करून बिदाग्या व देणग्यांखेरीज त्याला पंचवीस रूपयांची नेमणूक करून दिली होती. हा यशस्वी कीर्तनकार, शाहीर वैयक्तिक जीवनात उधळया व मद्यपी होता. सारा पैसा आणि वैभव त्याने व्यसनात उधळून टाकले व तो दरिद्री झाला. तो **स्वत:चा उल्लेख 'कविराय' असा करत असे.**

## ४.प्रभाकर (इ.स. १७६९ ते १८४३) –

शाहीर प्रभाकर हा नाशिक जिल्यातील गंगापूरचा. वयाच्या २२व्या वर्षी पुण्याला आल्यावर तेथे त्याचा तमाशाच्या जगाशी संबंध आला. त्याने आपल्या प्रतिभेच्या बळावर बाजीरावाची मर्जी संपादन केली. **बाजीरावाच्या विलासवर्णनपर अशा ३०–३२ लावण्या त्याने लिहिल्या.** प्रभाकरने पेशवाईचा उत्कर्ष आणि अवनती दोन्ही पाहिली होती. त्याचे प्रतिबिंब त्याच्या कवनात आढळते.

त्याने रचलेल्या **एकूण १३ पोवाडयांपैकी तीन सवाई माधवरावांवर, दोन दुसऱ्या बाजीरावावर, दोन पेशवेवंशवर्णनपर व बाकीचे राघोजी आंग्रे, नाना शंकरशेट इ. व्यक्तींवर आहे.** सवाई माधवरावांचा मृत्यू हा प्रभाकरलिखित पोवाडा करूणरसपूर्ण असून त्यातील यशोदेचा शोक ह्वदयाला पीळ पाडतो. हा पोवाडा म्हणजे

मराठी भाषेचा एक बहुमोल अलंकार आहे. पेशवाई गेल्यावर मात्र प्रभाकरचा आधार तुटला. पोटासाठी लाचार होऊन त्याला नाना शंकरशेठ, पेस्टनजीशेठ, स्प्रिंगलसाहेबाचे मोजणी ऑफिस यावर पोवाडे लिहावे लागले.

**प्रभाकरने दुसऱ्या बाजीरावावर ३०—३२ शृंगारिक लावण्या लिहिल्या.** बाजीराव हेच त्यातील नायक आहेत. काही लावण्यातील शुंगारवर्णनात नैतिकतेचे बंधन न राहिल्याने कामवासनेच्या भडक रंगाचे चित्रण त्यातून घडते. या व्यतिरिक्त त्याच्या लावण्या सुंदर आहेत.

'नका जाऊ दूरदेशी घरी काय धनद्रव्याला कमी । आली हो वर्षाची नागपंचमी ।

असा आपल्या पतीला घरी राहण्याचाआग्रह करणारी पत्नी काही लावण्यातून दिसते. निपुत्रिका व गर्भवासिनींच्या भावना काही लावण्यातून सांगतात. मराठी स्त्रियांच्या अंगावरील दागिण्यांचे (उदा. वज्रटिका, पानडया, पेटया, चित्रविचित्र मंगळसूत्रे, चंद्रहार, पुतळया, मोहनमाळ इ.) वर्णन करताना तत्कालीन सामाजिक जीवनातील समृद्धीचे चित्रण केले आहे.

प्रभाकरच्या पौराणिक लावण्यातही मानवी प्रवृत्तीचे सहज स्वाभाविक दर्शन घडते. लक्ष्मी—पार्वती संवादात आपला नवरा श्रेष्ठ आहे हे ठरविण्यासाठी लक्ष्मी व पार्वती एकमेकींच्या नवऱ्याचे दोष काढतात. देवतांच्या ठायी सामान्य स्त्रीच्या भावनांच्या रेखाटणाचे त्याचे कौशल्य नजरेत भरते.

### ५.होनाजी बाळा —

पिढीजात कवित्व करणाऱ्या घराण्यात होणाजी सयाजी शिलारखाने याचा जन्म झाला. **बाळा करंजकर शिंपी होणाजीचा साथीदार. शब्द होणाजीचे स्वर बाळाचा असा हा प्रकार होता.** साथीदाराचे बाळा हे नाव होणाजी आपल्या नावापुढे लावतो. कमालीची लोकप्रियता आणि पेशव्यांचा आश्रय यामुळे होणाजीला पुष्कळ संपत्ती मिळाली. त्याच्या कवित्वामुळे प्रतिस्पर्ध्यांना त्याचा इतका मत्सर वाटला की, त्यांनी मारेकरी घलून त्याचा वध केला. **होनाजीने ४—५ पोवाडे लिहिले.** पण ते तितके गाजले नाही. कारण होणाजीचे व्यक्तिमत्त्व पोवाडयापेक्षा लावणीशी जास्त मिळते जुळते होते. सवाई माधवरावांच्या रंगाचा समारंभ आणि खडर्याची लढाई या प्रसंगावरील पोवाडे त्याच्याकडून भर दरबारात गाऊन घेण्यात आले होते. बाजीरावाच्या विलासी जीवनावर मात्र त्याने बऱ्याच लावण्या लिहिल्या व आपल्या आश्रयदात्याच्या इष्काचे मुक्तकंठाने वर्णन केले आहे.

होनाजीच्या लावण्यांतून प्रेमभावनेच्या विविध छटा हळूवारपणे व्यक्त होतात. शृंगाराच्या उत्तान भावनेपासून निपुत्रिकेच्या करूण आर्ततेपर्यंत किती तरी वेगवेगळे रंग त्यात आढळतात. प्रीतीचे बाण मारून प्रवासाला निघून गेलेल्या पतीच्या विरहाने झुरणारी नववधू, विरहावस्थेत परपुरूषाला चतुर्थीच्या चंद्राप्रमाने वर्ज्य मानणारी एकनिष्ठ पत्नी यांची कितीतरी सुंदर चित्रे त्याने लावणीत काढली. उदा.

**'तुझ्या प्रीतीचे दु:ख मला दाऊ नको रे । वधून जाई प्राण घेई जगी ठेवू नको रे'**

या लावणीत प्रीतीचे सामर्थ्य व प्रीतीचा परिणाम कवी घडवितो. आणि

**'जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी । झडप घालुनी प्राण देतो दिपक वरी'**

अशी प्रेमविषयक जाणीवही करून देतो. अशा प्रकारची उत्कटता व श्रद्धा होणाजीच्या कवितेत आहे.

'लटपट लटपट तुझं चालणं मोठया नखऱ्याचं । बोलणं गं मंजुळ मैनेचं — नारी गं'

ही होनाजीची लावणी म्हणजे मराठमोळया स्त्रीच्या सौंदर्याचे सुंदर वर्णन आहे. या सौंदर्याला डौलदार गतीची साथ आहे. नादमय शब्दयोजना, शब्दांची पुनरूक्ती आणि समर्पक उत्प्रेक्षा यांतून मराठमोळया स्त्रीच्या सौंदर्याचा नखरा ढंगदारपणे व्यक्त झाला आहे. स्त्री ह्दयाचे सूक्ष्म विश्लेषण हे होनाजीच्या लावण्यांचे वैशिष्टे. त्याच्या काही लावण्यांत शृंगाराचा अतिरेक झाला असला तरी पातिव्रत्याचे आणि प्रेमाचे त्याला भरपूर भान आहे. शंकरपार्वतीसंवाद श्रीकृष्णतुला, द्रौपदीवस्त्रहरण मल्हारी मार्तंड, दमयंती विलाप अशा काही पौराणिक लावण्याही होणाजीने लिहिल्या आहेत.'फंदी अनंत कवनाचा सागर' ही लिहून त्याने फंदीच्या कवित्वाची मुक्तकंठाने केलेली प्रशंसा त्याच्या दिलदारपणाची साक्ष देते.

**'घन:श्याम सुंदरा, श्रीधरा अरूणोदय झाला, उठी लवकरी वनमाळी, उदयाजळी मित्र आला'**

ही होनाजीने लिहिलेली भूपाळी म्हणजे महाराष्ट्र शारदेला त्याने वाहिलेले अमर लेणे आहे. सहजरम्य वर्णने, कोमल भावना आणि प्रासादयुक्त भाषा यामुळे ही भूपाळी मराठी मनाला नित्य नवा आनंद देते. या कवनांतून सादर होणारी होनाजीची भाषाशैली त्याच्या भावनेला साथ देणारी आहे.

होनाजीच्या रचनेत इतर शाहिरांपेक्षा थोडे वेगळेपण आहे. तो एक प्रयोगशील कलावंत आहे. हे ही त्याचे वैशिष्टे आहे. तो संगीताचा चांगला जाणकार होता. होनाजीने लावणीचा रंग बदलला.

## समारोप –

शाहिरी वाङमय म्हणजे पोवाडा आणि लावणी. लौकिक जीवनात पुरेपूर रस घेऊन शाहिरांनी ही रचना केली. यातून त्यांनी तत्कालीन समाजजीवनाचे चित्र मांडले. शिवकालापासून या काव्याचा आरंभ झाला आणि पेशवाईबरोबर त्याची अखेर झाली. अशा या शाहिरी वाङमयात **वीररस आणि शुंगाररस** मोठया प्रमाणात दिसतो. वीररसयुक्त पोवाडयातून समाजमनात वीरश्रीचा संचार घडविण्याचे, तसेच काही प्रमाणात प्रबोधनाचे काम पोवाडयाने केले. तर लावणीत नजाकत, सौंदर्याचा नखरा, सुंदरतेचा आविष्कार दिसतो. लावणीच्या विषयातही विविधता दिसून येते. **लावणीत रगेल आणि पराक्रमी वीरांपासून रंगेल तसेच पळकुटया भेकटांपर्यंतचे वीरपुरूष, एकनिष्ठ पतिव्रतेपासून व्याभिचारी वृत्तीपर्यंतच्या स्त्रिया, दोन बायकांच्या दादल्याच्या फजितीपासून निपुत्रिकांच्या दु:खापर्यंतच्या विविध भावभावना, पुण्याच्या वैभवापासून दुष्काळाच्या स्थितीच्या वर्णने असे तत्कालीन जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण आढळते.** हे सर्व मराठी कवितेला नवीन होते.

राज्यकर्त्यांचे आणि आश्रयदात्यांचेही कीर्तिगान, यशोगान ही पोवाडयाची भूमिका. तर नागर, धनिक आणि रसिकांचे रंजन हा लावणीचा हेतू होता. लय, ताल, यमक, नादमाधुर्य, गोडवा यांना लावणीत स्वाभाविकपणे महत्त्व आले. त्यामुळे सुर, ठेक्याबरोबर लावणीत अभिनय महत्त्वाचा ठरला.

SANJAY MAPARI HRM

लौकिक जीवनात पूर्णपणे समरसून शाहिरांनी काव्यलेखन केले. लौकिक भावभावनांचे रंग घेऊन येणारा आत्माविष्कार, अस्सल मऱ्हाटमोळेपण आणि निवेदनाचा ढंगदारपणा शाहिरांनी मराठी कवितेला दिला. भाषेलाही काही नखरा, ढंग असू शकतो याची जाणीव करून दिली. या जाणिवेने मराठी कविता आणि मराठी मन फुलू लागले. संपन्न झाले. राम जोशी, अनंत फंदी, सगनभाऊ, होणाजी बाळा, परशराम इ. सर्व शाहीर कवींनी मराठी कवितेचे दालन समृद्ध केले.

..............................................................................................................................

**अध्यापन साहित्य निर्मिती :**
**डॉ. संजय शिंदे**
**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

१) **मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास नसिराबादकर.रा.ल :**

२) **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : अ.ना.देशपांडे**

SANJAY MAR HRM